ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

राजकीय व्यवस्था आणि महिला सबलीकरण

प्रा. डॉ. कैलास सोनवणे.
राज्यशास्त्र विभाग
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय
राजगुरूनगर,ता.खेड,जि. पुणे

प्रस्तावना

भारतात पुरूशसत्ताक समाजव्यवस्था असताना देखील 1982 साला पासून या व्यवस्थेला हादरा देण्याचे कार्य आपल्या समाजातील काही कतृत्ववान महिलांनी सुरू केले. महिलांनी चुल आणि मूल याच्या पलिकडे जावु नये अशी व्यवस्था असताना महिलांनाही समाजात मानाने जगता आले पाहिजे. आपल्या हक्कांची जपणूक करताना आपल्या सुप्त गुणांच्या आधारे विकास करता आला पाहिजे. या प्रबळ विद्रोही विचाराच्या जोरावर अनेक महिलांनी एकमेकींच्या आधारे समाजात संघटीतपणाचे जाळे उभे केले. यातुनच, पुढे स्त्री संघटना सारख्या हक्कांची जाणीव मिळवून देणाऱ्या चळवळी निर्माण झाल्या. समाजात, कुटुंबात आपला हक्क मिळविल्यानंतर त्या संघटित व सक्षम महिलांनी वेगवेगळे प्रांत पादाक्रांत करावयास सुरवात केली.

याचाच एक भाग म्हणजे राजकीय प्रक्रियेत महिलांनी मारलेली मुसंडी. राजकारण हे क्षेत्र फक्त पुरूशांचीच मालकी असलेले हा समज चुकीचा ठरवत महिलांनी राजकीय प्रक्रियेत आपल्या कुशलतापुर्वक कृतीने सकारात्मक दृश्टीकोणाच्या आधारे आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवण्यास सुरवात केली. हया विशयीचीच सविस्तर मांडणी पुढील प्रमाणे करता येते.

महिला राजकीय सहभागाचा ऐतिहासिक संदर्भः

आज आपणास महिला राजकीय प्रक्रियेत राश्ट्रपती पदापर्यंत पोहचल्याचे दिसते हे खरे असतानाही महिलांनी राजकीय प्रक्रियेत येवु नये तो प्रांत त्यांचा नाही अशी भूमिका पुरूश प्रधान व्यवस्था घेताना दिसते. याच व्यवस्थेला व त्यातील मानसिकतेला म्हणजे महिलांना राजकीय व्यवस्था समजत नाही. हा गैरसमज दुर करण्यासाठी व महिलांना राजकीय सबलीकरणास प्रोत्साहीत करण्यासाठी भारतीय इतिहासात डोकावले असता आपणास खालील वेगवेगळया कालखंडातील अनेक महिलांनी राजकीय व्यवस्थेत आपले कर्तृत्व कसे सिध्द केले हे समजण्यासाठी खालील प्रमाणे मांडणी करता येईल.

शिवकालीन कालखंडः

महाराश्ट्राच्या इतिहासात शककर्ता शालिवाहन याची आई गौतमी यांचे किंवा

1 चांदबिबी सारख्या मोजक्याच स्त्री राज्यकर्त्यांची नावे आढळून येतात. मध्ययुगीन मराठी समाजात स्त्रियांच्या कर्तृत्वाला मान दिल्याचे आढळून येते. याचे उदाहरण म्हणजे राजकीय धुरंधर जिजाबाई होय, खरे तर महाराश्ट्रात राजकीय धुरंधर स्त्रियांच्या परंपरेला जिजाबाई पासूनच सुरवात होते. जिजाबाईंनी शिवाजीला घडविले. राज्य कारभारात जिजाबाई कुशल होती. शिवाजी महाराज आग्रयाला औरंगजेबाच्या कैदेत असताना जिजाबाईंनी राज्याची सर्व जबाबदारी सांभाळली. शिवाजी महाराजांच्या सुना येसूबाई व ताराबाई यांनी मराठयांचे राज्य शेवटपर्यंत सावरून धरले. तर ताराबाई मुत्सद्देगिरीत अग्रेसर होत्या. औरंगजेबाचे मनोरथ त्यांनी हाणून पाडले. ताराबाईनीच मराठयांची दृश्टी दिल्लीपर्यंत पोहचविली. आणि मराठयांच्या भावी राज्य विस्ताराचा पाया घातला. अशा पध्दतीने शिवकाळात अनेक महिलांनी राजकारणातले आपले कसब दाखवून दिल्याचे दिसते.

पेशवाईचा कालखंडः

पेशवाईच्या काळातही राजकारणात अनेक विद्वान स्त्रिया होऊन गेल्याचे दिसून येते. पेशव्यांची पहिल्या दर्जाची सरदारकीही त्यांनी सांभाळलेली दिसते. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो म्हणजे अनुबाई घोरपडे यांचा त्यांनी अज्ञान मुलांच्या नावे जहागिरीचा कारभार पाहिला तर उमाबाई खंडेराव दाभाडे यांनी गुजरातमध्ये मराठा सत्तेला ध्यैर्य प्राप्त करून दिले. अहिल्याबाई होळकर याही कर्तृत्ववान होत्या. स्वतःच्या राज्या बरोबरच उत्तरेकडील मराठी राज्याची जबाबदारी त्यांनी सांभाळली. अहिल्याबाईचे सासरे मल्हारराव होळकर यांनी सुनेच्या कर्तृत्वाची पारख करून सर्व पुरूश वारसदार बाजुला करून अहिल्याबाईंवर, राज्याची जबाबदारी सोपवून स्त्री जातीचाच एकप्रकारे बहुमान करून स्त्रियांचे राजकारणातील महत्व निश्चित केले.

19 व्या शतकाच्या पुर्वार्धात मराठयांचे राज्य लयाला गेले. इंग्रजांनी सत्ता काबीज केली. याच काळात झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने मोठया धैर्याने इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. स्वतःच्या छोटया दत्तक मुलाच्या नावाने राज्यकारभार केला. आपले गेलेले स्वातं०य परत मिळविण्यासाठी ती प्राणपणाने लढली व राजकारणातील आपले स्थान अढळ केले.त्याच बरोबर नागपुरच्या बाभाबाई भोसले,

2

ग्वाल्हेरच्या बायजाबाई शिंदे, कोल्हापूरच्या ताईसाहेब राणी सरकार यांनीही राज्याची धुरा सांभाळली. या व अशा अनेक महिलांनी पेशवाईच्या कालखंडात राजकारणात आपली चुणूक दाखविल्याचे दिसते.

ब्रिटिश कालखंडः

व्यापारासाठी म्हणुन आलेल्या इंग्रजांनी भारतावर पुर्णपणे कब्जा केला. ते प्लासीच्या लढाईनंतर भारतात सत्ताधारी शक्ती म्हणुन स्थिरावले. इंग्रजी राजवटीच्या आक्रमणाने भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया ढासळला. जनतेमध्ये स्वातं०याचे वारे वाहु लागले. देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक मंडळी पुढे सरसावली. हयाच काळात समाजसुधारक, स्त्री–पुरूशांनी स्त्रियांच्यामध्ये सामाजिक जागृती केली. या स्वातं०य लढयात भाग घेण्यासाठी देश प्रेमाने प्रेरित होवुन अनेक महिलांनी सक्रिय भाग घेतला. स्वदेशी, बहिश्कार, सत्याग्रह, चळवळ या गोश्टी थेट चुलीपर्यंत पोहचल्या. साहजिकच राजकीय कार्यात अनेक महिला स्वेच्छेने उतरल्या. महात्मा गांधींनी स्त्री वर्गातील कार्य करण्याची शक्ती जागृत केली. स्त्रियांच्या शक्तीचा व संघटनेचा ओघ राश्ट्रकार्याकडे वळवावा म्हणुन मुंबई येथे दि. 27/11/1918 ला हिंद महिला सभेची स्थापना केली. स्त्रियांना राजकारणाची माहिती व्हावी व स्वातं०य लढयाचे नेतृत्व पटावे या उद्देशाने अशा प्रकारच्या अनेक संस्था स्थापन झाल्या.

रमाबाई रानडे, यशोदाबाई भट, येसुवहिनी सावरकर, पारूबाई दास्ताने, पार्वतीबाई ठकार, इ. स्त्रियांनी आपल्या पतीच्या साहाय्याने स्त्री वर्गात राजकीय जागृतीचे कार्य केले.

1920 पासुन स्त्रिया स्वातं०याच्या चळवळीत मोठया प्रमाणात उतरू लागल्या. राजकीय सभा, प्रभातफेऱ्या, सत्याग्रह, निदर्शने यात सहभागी होऊ लागल्या. चळवळीत भाग घेण्यासाठी सर्वसामान्य स्त्रियांना घरात मोठया प्रमाणावर बंडखोरी करावी लागली. 1920 ते 1930 या दशकातील महिलांनी विधायक कार्यक्रमात आपण मागे नाही हे सर्व प्रकारच्या कार्यक्रमात यशस्वीरित्या भाग घेऊन सिध्द केले.

याच काळात स्त्रियांच्या मध्ये झालेल्या प्रचंड जागृतीची परिणीती महाराश्ट्रभर

3 ज्या स्त्री संघटना स्थापन झाल्या त्यातुन दिसून येते. जरी जागृती झाली असली तरीही प्रभातफेऱ्या, निदर्शने, निशेध सभा अशा प्रासंगिक कार्यक्रमांना मोठया संख्येने महिला उपस्थित राहिल्या. तरी प्रसंग संपला की त्या आपआपल्या संसाराला लागत.

राजकीय कार्य हे त्यांचे ध्येय नव्हते. तरी देशाच्या स्वातं. ०यांची त्यांची तळमळ होती. म्हणुनच अनेक स्त्रिया स्वातं०य चळवळीत सहभागी झाल्या होत्या. कालांतराने चळवळीच्या दैनंदिन कार्यात फार थोडया स्त्रिया टिकुन राहिल्या. त्यांनी नंतर विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. स्वातं०योत्तर काळात पक्ष, कायदेमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, कामगार चळवळ यातून त्यांचे अस्तित्व जाणवते. अवंतिकाबाई गोखले, मालिनी सुखटणकर यांनी मुंबई महानगरपालिकेची तर मधुमालती गुणे यांनी पुणे नगरपालिकेची निवडणुक लढवुन स्थानिक स्वराज्य संस्थात प्रवेश केला. 1937 साली झालेल्या विधिमंडळाच्या निवडणुकीत अन्नपुर्णाबाई देशमुख, लक्ष्मीबाई ठुसे निवडून आल्या.

1942 ते 1947 हया कालखंडात भारतीय स्त्रीने विविध मार्गांनी चळवळीची ज्योत अखंड तेवत ठेवली व आपला राजकीय प्रवास चालूच ठेवला. म्हणजेच ब्रिटीश काळात स्वातं०य चळवळीपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपर्यंत अनेक महिला राजकारणात आपले कर्तुत्व सिध्द करत होत्या. हे दिसून येते.

स्वातंत्योत्तर कालखंडः

भारतीय स्वातं०य लढयातील स्त्रीयांची संख्या लक्षणीय नव्हती हे जरी खरे असले तरी त्यांच्या संख्यने कमी असल्यामुळे तत्कालीन परिस्थितीत जेवढया स्त्रीया या चळवळीत होत्या त्यांच्या कार्याकडे निश्चितच दुर्लक्ष करून चालणार नाही. अशात काही मोजक्या स्त्रिया ज्या चळवळीत होत्या त्याच पुढे स्वातं०य भारतीय राजकारणात आपणास दिसतात. 1947 नंतर अनेक स्त्रियांनी इतर क्षेत्रांप्रमाणेच विधिमंडळाच्या क्षेत्रातही पदार्पण केले. नवीन विधिमंडळे अस्तित्वात आली. यात अनेक महिला उमेदवार उभ्या राहिल्या आणि त्यापैकी सात निवडुनही आल्या. या सात महिला संदस्यांमध्ये सुमंती गोरे व ताराबाई मोडक या महाराश्ट्रातील दोन

4 प्रसिध्द शिक्षण तज्ञ होत्या. निवडणुकीच्या तिकीटाच्या निवड समितीवर पुरूशांचे वर्चस्व असते. पक्षातील राजकीय हितसंबंध सांभाळण्यासाठी तिथे योग्य अशी स्त्री उमेदवार असली तरीही तिला डावलुन पुरूशांना तिकिटे दिली जातात. विरोधी पक्षांकडे स्त्री कार्यकर्ते कमी असतात त्यामुळे स्त्रियांना तिकीटे देण्यात अडचण येते. असं एक सोयीस्कर कारण सांगितले जाते. या पार्श्वभुमीमुळे 1952 ते 1977 पर्यत लोकसभेवर फक्त 10 मराठी भाशिक स्त्रिया व राज्यसभेवर 5 मराठी भाशिक स्त्रीया सदस्य बनु शकल्या. या सर्व महिलांच्या संसदीय कार्याविशयी पाहिले असता त्यांचे कार्य कौतुकास्पदच होते. राज्यसभेचे अध्यक्षपद ताराबाई मोडक यांनी अनेक वेळा स्विकारून स्पृहणीय कामगिरी केलेली आहे. याचाच अर्थ संसदीय कार्य पध्दतीत महाराश्ट्रातील स्त्रियामागे नव्हत्या. हेच यावरून दिसून येते. थोडक्यात महाराश्ट्रातील या महिला प्रतिनिधीच्या कार्याच्या विश्लेशणावरून असे वाटते की, मराठयांच्या इतिहासातील राजकारणात भाग घेणाऱ्या स्त्रियांची परंपरा त्यांनी राखली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांसाठी 30 टक्के राखीव जागाः

1 मे 1960 रोजी महाराश्ट्र राज्य अस्तित्वात आले. तेव्हापासूनच शासनाविशयी लोकांमध्ये आत्मीयता निर्माण करावयाची असेल तर निवडणुकीच्या द्वारे स्थापन झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक बाबतीत प्रशासनाचे अधिकार दिले पाहिजे. याच उद्देशाने आपण लोकशाही विकेंद्रीकरणाची पध्दत स्विकारून 1 मे 1962 पासून पंचायती राज व्यवस्था सुरू केली.

पंचायत राज्याची रचना त्रिस्तरीय स्वरूपाची असून श्री. बलवंतराय मेहता आणि वसंतराव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुशंगाने त्रिस्तरीय रचना स्विकारली आहे. यामध्ये गावपातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर, पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिशद ही ग्रामीण भागाची रचना तर शहरी भागासाठी नगरपालिका व महानगरपालिका हया संस्था कार्यरत आहे.

देशाच्या विकासाच्या कार्यात तळागाळातील लोकांचा सहभाग असावा आणि दुर्बल घटकातील लोकांना न्याय मिळावा म्हणुन स्थानिक स्वराज्य संस्थेची रचना

5 केली गेली. खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण व्हायचे तर स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त असाव्या लागतील. तसेच त्यामध्ये उच्च हितसंबंधी गटांचे नेतृत्व नसावे आणि समाजातील दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व मिळावे ही अपेक्षाही महत्त्वाची आहे. म्हणुनच भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना पुरूशांच्या बरोबरीने समान हक्क दिले. यामध्ये राजकीय हक्क आहेत. घटनेने कलम 14 द्वारे स्त्री–पुरूश समानता मानली आहे. त्यामुळे त्यांना मतदानाचा आणि निवडणुका लढविण्याचा अधिकार मिळाला. पण हे हक्क वापरण्यासाठीची परिस्थितीती मात्र अनुकूल नव्हती. आर्थिक विशमता, स्त्री–पुरूश भेद सर्वच क्षेत्रातील पुरूशी वर्चस्व आणि सर्वस्वी असलेली कौटुंबिक जबाबदारी यामुळे स्त्रियांना हे हक्क बजावणं शक्य होत नव्हते आणि हीच वस्तुस्थिती स्त्रियांना राजकारणापासून दूर ठेवत होती.

शहरात वा गामीण भागात, सार्वजनिक क्षेत्रात विशेशतः राजकारणात स्त्रियांना सहभाग कमीच होता. म्हणुन पुर्वी ग्रामपंचायतीत दोन स्त्रियांना प्रतिनिधित्व दिले जाई. परंतु हे असे प्रतिनिधित्व फारच प्रतिकात्मक असे. त्यातुन स्त्रियांच्या आकांक्षांना वाव मिळणे अशक्यच झाले. इतकेच नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थेला गुंडांच्या राज्याचे रूप येवू लागले. अशा परिस्थितीत मार्च 1990 मध्ये श्री. शरद पवार शासनाने जिल्हा परिशदा, कॉर्पोरेशनच्या निवडणुका लांबणीवर टाकता–टाकता अचानक स्त्रियांसाठी 30 टक्के राखीव जागांची तरतुद नगरपालिका, जिल्हा परिशद पातळीवर जाहीर केली. हा खरेतर राजकीय निर्णय असला तरी स्त्रियांच्या क्षमतेला पुर्ण वाव देऊन त्यांच्या सक्रिय पाठिंब्याने सामाजिक पुर्नरचना घडवुन आणणारा हा निर्णय होता. एप्रिल 1990 मध्ये विधानसभेत 30 टक्के राखीव जागांचे विधेयक पास झाले. आणि महाराश्ट्रात या ऐतिहासिक निर्णयाने महिलांच्या राजकीय सबलीकरणास खऱ्या अर्थाने सुरवात झाली.

तसे म्हटले तर महाराश्ट्रातही 1975 नंतरच नव्या स्त्री चळवळीने जोर धरला. स्त्री–अत्याचाराच्या प्रश्नाला वाचा फुटली. स्त्रिवर होणारे बलात्कार, अत्याचार म्हणजे एक दोन घरातील खासगी प्रकरणे नसून तो स्त्रीच्या व्यवस्थात्मक दुय्यम स्थानाचा परिपाक आहे. हे नव्या स्त्री चळवळीने जोरकसपणे मांडण्यास सुरवात

केली. भारतीय समाजातील सर्व संस्था रचनांमध्ये आमुलाग्र परिवर्तन

झाले नाही तर वर्ग, जात हयांच्या उतरंडीखाली दाबल्या गेलेल्या स्त्री जातीलाही कधीच न्याय मिळणार नाही ही जाणीव पसरू लागली. स्वातं०योत्तर काळात भारतीय स्त्रियांची सर्वच राजकीय पक्षांत कशी गळचेपी होते आहे. आणि सत्ताकारण, राजकारण हया क्षेत्रांतुन स्त्रियांची पध्दतशीरपणे हकालपट्टी होते आहे. हयाबद्दलही बोलले जाऊ लागले. परंतु तेव्हा सर्वच स्त्री संघटनांनी स्त्रियांना राखीव जागा हव्यात असा आग्रह धरला नाही. कारण 30 टक्के राखीव जागा देऊन उरलेल्या 70 टक्के जागांपासुन स्त्रियांना दुर ठेवण्याचे हे शडयंत्र असू शकेल असा संशय त्यांच्या मनी होता. तसेच एकुण राखीव जागांच्या राजकारणात सत्ताधारी पक्ष स्वतःचा फायदा करून घेऊ शकतो. हयाचीही त्यांना जाणीव होती. एकुणच स्त्रीवादी राजकारण, पर्यायी विकास नीती इत्यादी विचार व्यक्त केले जात असतानाच 30 टक्के राखीव जागांची तरतुद जाहीर झाली.

30 टक्के राखीव जागांमुळे जवळजवळ 3000 स्त्रियांना महाराश्ट्र राज्याच्या स्थानिक कारभारात काम करण्याची संधी मिळाली आहे. हया सर्वच स्त्रियांना राजकारणाचे प्रशिक्षण हया प्रक्रियेतून मिळणार आहे. इतकेच नाहीतर प्रत्येक राखीव जागेसाठी जर तीन स्त्रिया निवडणुक लढविण्यासाठी उभ्या राहिल्या असतील तर जवळजवळ 9000 स्त्रिया हया निवडणुकीच्या निमित्ताने कृतिशील झाल्या असे म्हणता येईल. हयातून महिलांचे एकप्रकारे राजकीय सबलीकरणच होते आहे. असेच म्हणावे लागेल. थोडक्यात महाराश्ट्रात 1990 नंतर 30 टक्के राखीव जागांच्या तरतुदीने अनेक महिलांना राजकारणात सहभागी करून तत्कालीन शासनाने महिलांच्या सक्षमीकरणावर मोहोर उमटविली होती व त्यातुनच प्रथमतःच मोठया प्रमाणावर महाराश्ट्रात महिलेच्या राजकीय सबलीकरणास सुरूवात झाली.

महिला आरक्षण विधेयकः

1950 नंतरच्या भारतीय राजकारणात नाही म्हटले तरी पुरूशी वर्चस्व प्रस्थापित झाले होते व ज्या महिला राजकारणात होत्या त्यांचे असणे आणि नसणे हे सारखेच होते. त्यातच महाराश्ट्रात 1990 मध्ये स्थानिक संस्थामध्ये महिलांसाठी 30 राखीव जागांची तरतुद केली. महाराश्ट्राबरोबरच कर्नाटक–25 टक्के, केरळ – 30 टक्के, पश्चिम बंगालमध्ये विचार चालू आहे. अनेक राज्यात महिलांचे

राजकीय सक्षमीकरण होत असतानाच देश पातळीवरील संसदीय राजकारणी महिलांना 33 टक्के राखीव जागा दयाव्यात अशी चर्चा सुरू झाली. 1996 साली(12 सप्टेंबर,1996) एच. डी. देवेगौडा यांच्या नेतृत्वाखालील सरकारने संसदेत आणि विधीमंडळात 33.3 टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्याचा प्रथम प्रस्ताव लोकसभेत ठेवला होता. त्यानंतर अनेकदा तो विशय पटांवर आला पण दरवेळी पुरेशा मताधिक्क्याअभावी तो पुनःपुन्हा अडगळीत टाकण्यात आला.

आज भारतातील प्रत्येक राजकीय पक्ष हया महिला आरक्षणाला पाठींबा देतो. आम्हीच कसे प्रागतिक आहोत, आणि महिलांना राजसत्तेत येण्यास अधिक वाव दिला पाहिजे हे तत्वतः मान्य करतो, पण त्यांच्या 'वाणी' आणि 'करणी' यामध्ये महद् अंतर आहे. आणि या मागच्या सर्व पक्षांच्या कारणमीमांसेमागे एकमत आहे.

महाराश्ट्रातील स्थिती याहून वेगळी निश्चित नाही. 48 जागा आणि त्यासाठी लढणारे पाच–सहा प्रमुख पक्ष मिळुन जेमतेम 10 महिला उमेदवार असतात. त्यातही निवडुन देण्याची शक्यता असलेल्या महिला उमेदवाराची संख्या जेमतेम दोन ते तीन असते. प्रागतिक महाराश्ट्राचे हे चित्र आपणांस दिसते.

थोडक्यात भारतात महिलांच्या राजकीय सबलीकरणासाठी संसद व विधिमंडळातील महिला आरक्षण हा विशय अतिशय महत्वाचा असुनही गेल्या 12 वर्शात तो अडगळीत फेकून दिला जातो व फक्त निवडणुका आल्या की तो अडगळीतून बाहेर येतो हे मान्य केले तरी महिला आरक्षण विधेयकामुळे महिलांच्या राजकीय सबलीकरणास एक धार येणार आहे हे निश्चित.

73 वी घटना दुरूस्ती आणि महिला सबलीकरणः

महिलांचे सबलीकरण हा वैश्विक पातळीवरील अत्यंत महत्वाचा चर्चेचा विशय आहे. महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांमधील सहभाग वाढविणे हा सबलीकरणाच्या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे. यातील राजकीय सहभाग हा मुख्य मुद्दा घेतला तर महिलांनी राजकीय प्रक्रियेत आले पाहिजे व त्यासाठी उपाययोजना प्रथम केली पाहिजे.

खरेतर ब्रिटीश राजवटीतच विधी मंडळात महिला आरक्षण मागणी झाली होती. पण राश्ट्रीय नेत्यांच्या विरोधामुळे ती फेटाळली गेली. पुढे 1931 मध्ये ऑल

इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स, वुमेन्स इंडियन असोसिएशन, नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन इ. महिला संघटनांनी महिला मताधिकार, राजकीय प्रतिनिधित्व, प्रशासकीय पदांची मागणी केली होती. तसेच घटना समितीतही स्त्रियांना आरक्षणाची मागणी केली होती. पण हे आरक्षण समतेविरोधी असल्याने महिला प्रतिनिधीत्व फेटाळले. डॉ. सरोजनी नायडुनी आरक्षण म्हणजे दुय्यम दर्जा अशी भुमिका घेतली.

त्यानंतर अनेक प्रसंगी यावर चर्चा झाली पण महिला प्रतिनिधींनी राजकीय प्रक्रियेत यावे असे आग्रहपुर्वक कोणाला वाटत नव्हते.

मात्र 20 एप्रिल 1993 रोजी भारतातील राज्यघटनेत 73 वी घटना दुरूस्ती तत्कालिन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी करून एक इतिहास निर्माण केला. याच सरकारने स्थानिक संस्थाच्या कार्यात स्थानिक लोकांचा सहभाग असावयास हवा या उद्देशाने पंचायत राज विधेयक मांडले. आणि 24 एप्रिल 1993 पासून हया महत्वपुर्ण आणि महिलांच्या राजकीय सबलीकरणास पुरक ठरणाऱ्या पंचायत राज कायदयाची अंमलबजावणी सुरू झाली.

73 व्या घटना दुरूस्तीमुळे पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. सत्तचे विकेंद्रीकरण होवुन सत्ता समाजाच्या तळागाळापर्यंत पाहोचली. राज्यातील अनुसुचित जातीजमाती, मागास वर्ग, व प्रामुख्याने महिला यांना राज्य कारभारात सहभागी करून घेतले. त्यांच्यासाठी आरक्षण निर्माण करून त्यांचे प्रतिनिधीत्व निर्माण केले. थोडक्यात 1992 ची 73 वी घटनादुरूस्ती महिलांना राजकीय समानतेची नवी ओळख करून देणारी घटना दुरूस्ती ठरली. एवढेच नव्हेतर ही घटना दुरूस्ती म्हणजे महिलांच्या राजकीय सबलीकरणाची क्रांतीच मानावी लागेल. कारण या घटना दुरूस्तीनंतर झालेल्या पहिल्या पंचायत राज निवडणुकीत जवळपास एक करोड महिलांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला म्हणजेच ही घटना दुरूस्ती राजकीय सबलीकरणास घट्ट करणारी ठरली. भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरूशांच्या बरोबरीने समान हक्क दिले. यामध्ये राजकीय हक्कही होते. पण हे हक्क वापरण्यासाठीची परिस्थिती मात्र अनुकूल नव्हती. हे चित्र सुरवातीस संपुर्ण भारतात दिसत होते. मात्र स्त्री संघटनांच्या जोरदार व आक्रमक भुमिकेमुळे अप्रत्यक्षपणे सरकारला त्यांना राजकीय हक्क प्रदान करावे

लागले. खरेतर वर मांडणी केल्याप्रमाणे सुरवातीपासुनच महिलांनी राजकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यानंतरचे 30 टक्के आरक्षण, 33 टक्के राखीव जागा, 73 वी घटना दुरूस्ती यासारख्या लोकशाही मार्गाने महिलांच्या सबलीकरणास भक्कम आधार मिळाला. आज आपणास देशभरातील दहा लाखाच्या वर स्त्रियांना पंचायत राजव्यवस्थेमध्ये आणलं. त्यांचा राजकीय सहभाग वाढविला असे चित्र स्पश्टपणे दिसते. एरवी, ग्रामपंचायतीच्या आसपास फिरण्याचं स्वप्नही ज्यांना कधी पाहता आल नसतं, त्यांना या विधेयकामुळे गावातल्या सत्तेत प्रत्यक्ष हक्काचा वाटा मिळाला. या महिलांना केवळ सामान्य प्रतिनिधीत्व नाही तर सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिशद अध्यक्ष, महापौर, अशी मानाची प्रमुख पदही स्त्रियांना मिळाली. गावाचा विकास, पाणी, शाळा, रस्ता, दारूबंदी यांसारखे कळीचे विशय महिलांनी पुढे आणले. दुर्गम आदिवासी, डोंगराळ, ग्रामीण भागातील महिलांनी ग्रामविकासासाठी आणि जन विकासासाठी विशेश

कामगिरी केल्याचे दिसत आहे. हे सर्व फक्त वरील तरतुदींच्या माध्यमातुन महिलांमध्ये झालेले राजकीय सबलीकरणच आहे हे मान्यच करावे लागते.

संदर्भग्रंथः

1. ज. शं. आपटे, पुश्पा रोडे, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008.
2 डॉ. विद्युत भागवत, स्त्री – प्रश्नांची वाटचाल, प्रतिभा प्रकाशन, पुणे – 2004.
3 डॉ. भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकिय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर – 2005
4 महाराश्ट्र सरकार निवडणूक अहवाल 2000.